# वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

## राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) १७ वी बैठक शुक्रवार,

## दि.०७/११/२०२५ चे इतिवृत्त

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) ची १७ वी बैठक शुक्रवार, दि. ०७/११/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे अध्यक्षतेखाली वसुंधरा, पुणे येथे Online पद्धतीने संपन्न झाली. सदर बैठकीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. कमलाकर रणदिवे | अध्यक्ष, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, २.० |
| २ | श्री. विजय देवराज | सह सचिव, मृद व जलसंधारण मंत्रालय, मुंबई |
| ३ | डॉ. संजय पाटील | प्रमुख, MRSAC, पुणे |
| ४ | श्री. भामरे | अवर सचिव, मृद व जलसंधारण मंत्रालय, मुंबई |

सदर बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांची यादी स्वतंत्रपणे जोडण्यात येत आहे. बैठकीच्या सुरुवातीला मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत करून विषयाचे प्रास्ताविक केले.

**विषय क्र. १)**

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत अमृत सरोवर या कामांची १५ जिल्ह्यातून एकूण ६६ प्रस्ताव वसुंधरा, पुणे या कार्यालयात प्राप्त झालेले असून त्यापैकी ११ प्रस्तावास १६ व्या SLTC बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. उर्वरित प्रस्तावांची GIS च्या दृष्टीने तसेच तांत्रिक दृष्टीने तपासणी करण्यात आलेली असून जे प्रस्ताव तांत्रिक दृष्टया योग्य ठरले आहेत अशा प्रस्तावांना मान्यता देणेबाबत राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) च्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन सफल प्राप्त प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्रदान

करण्यासाठी WCDC या समितीस शिफारस करण्यात आली. याबाबतचा सविस्तर तपशील पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे §

### अमृत सरोवर प्राप्त प्रस्ताव

| अ.क्र. | जिल्हा | गावाचे नाव | प्रकल्प क्र. | प्राप्त प्रस्तावांची रक्कम रु. लाख | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC) चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | बीड | अंभोरा-१ | १ | १८.८९२०० | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| २ | | अंभोरा-२ | | १८.८९२०० | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ३ | | लमाणतांडा | | १८.८९२०० | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ४ | वाशीम | येवती | ७ | १५.२२९०१ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ५ | सोलापूर | सलगर बु. | २ | १८.८८७८५ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |
| ६ | | सोड्डी | | १८.६६४५९ | सदर प्रस्तावास शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे सादरीकरण करण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी एकूण ०६ प्रस्ताव तांत्रिक दृष्टया योग्य ठरल्याने त्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

१) अमृत सरोवर कामाची अंमलबजावणी यंत्रणा जिल्हा जलसंधारण अधिकारी राहतील.

२) WCDC ची मान्यता प्राप्त झाल्यानंतर जिल्ह्यांच्या ज्या प्रकल्पात अमृत सरोवर च्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली आहे त्या जिल्ह्यांनी अमृत सरोवर या बाबीवर खर्च करण्यास सुरुवात करून सदर कामाचा समावेश सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये (DPR) करावा.

३) अमृत सरोवर या बांधकामासाठी NRM Governance या घटकामधून तरतूद रक्कम रु. २५.०२ कोटी पैकी रक्कम रु. ७ कोटी इतका निधी काढून घेवून उर्वरित रक्कम रु. १८.०२ कोटी या flexi-fund मधून अमृत सरोवर या बाबीवर खर्च करण्यास व सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये समाविष्ट करण्यास समितीने मान्यता दिली. याबाबतचे निधी खर्चाचे प्रमाण राज्यस्तरावर राखण्यात येईल.

४) जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी काम पूर्ण झाल्यावर पाणीसाठा प्रमाणित करणे आवश्यक राहील.

५) मोजमाप पुस्तकातील नोंदी जलसंधारण अधिकारी यांनी करावयाच्या असून उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी मोजमापे १०० % तपासणे आवश्यक आहे.

तपासणी करूनच पुढील येणाऱ्या SLTC मध्ये निर्णय घेण्यात येईल, असे निर्देश समितीने दिले.

## विषय क्र. २)

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत उपजीविका उपक्रम (LAP) या घटकाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) चे सादरीकरण करण्यात आलेले आहे.

सादरीकरण करण्यात आलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ९ प्रकल्पांच्या उपजीविका उपक्रम (LAP) च्या सविस्तर प्रकल्प अहवालांना राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC)ची मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. याबाबतचा सविस्तर तपशील पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

### उपजीविका उपक्रम (LAP) या घटकाच्या सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR)

| क्र. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC) चे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | Sindhudurg (WDC.2)/1/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| २ | | Sindhudurg (WDC.2)/2/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ३ | | Sindhudurg (WDC.2)/3/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर प्रकल्पातील तक्ता क्र. ६-६.४ मधील उपजीविका उपक्रम निधी विराण रक्कम चुकीची दर्शवलेली आहे. सदर त्रुटीची पूर्ततेच्या अधीन राहून सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ४ | | Sindhudurg (WDC.2)/4/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर प्रकल्पातील तक्ता क्र. २ मधील उपजीविका निधी हा प्रकल्प मूल्याच्या १५ % च्या प्रमाणापेक्षा कमी-जास्त नमूद केलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सदर त्रुटीची पूर्ततेच्या अधीन राहून सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ५ | सिंधुदुर्ग | Sindhudurg (WDC.2)/5/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ६ | | Sindhudurg (WDC.2)/6/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ७ | | Sindhudurg (WDC.2)/7/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर प्रकल्पातील तक्ता क्र. ७-७.३ मधील उपजीविका उपक्रम निधी वितरणासाठी नापणे ग्रामपंचायती मधील गट संख्या २६ नमूद केलेली आहे. सदर त्रुटीची पूर्ततेच्या अधीन राहून सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ८ | | Sindhudurg (WDC.2)/8/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर प्रकल्पातील तक्ता क्र. ७-७.२ मधील समुदाय गंतवणूक निधी व ७-७.३ मधील उपजीविका उपक्रम निधीची रक्कम चुकीची दर्शवलेली आहे. सदर त्रुटीची पूर्ततेच्या अधीन राहून सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| ९ | | Sindhudurg (WDC.2)/9/2021-22 | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण जिल्हा प्रकल्प समन्वयक (DPC) श्री. नितीन सावंत यांनी केले. सदर प्रकल्पातील तक्ता क्र. ५-५.६ व ७-७.३ मधील गटांच्या संख्येमध्ये फरक दिसून येत आहे. सदर त्रुटीची पूर्ततेच्या अधीन राहून सदर स. प्र. अ. ला मंजुरीस्तव शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे दोन्ही विषयाच्या सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात येऊन योग्य ते निर्देश संबधितांना देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

7·11·25

(कमलाकर रणदिवे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २,०.
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

उपस्थित अधिकाऱ्यांची नावे खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीम. अश्विनी जगताप | उप मु.का.अ., वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| २ | श्रीम. दीपा बापट | उप मु.का.अ., वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे |
| ३ | श्री. दिलीप प्रक्षाळे | पाणलोट विकास नियंत्रक (कोकण,पुणे,नाशिक व छ. संभाजीनगर विभाग) |
| ४ | श्री. पांडुरंग शेळके | पाणलोट विकास नियंत्रक (अमरावती व नागपूर विभाग) |